**<u>ठळक बातम्या</u>**

- ११ व्या रायसिना संवादाचं आज नवी दिल्लीत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- पश्चिम आशियातला संघर्ष अधिक तीव्र

- राज्यसभेच्या ३७ जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आज शेवटचा दिवस

- महाराष्ट्राचा २०२५- २६ या वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल विधानसभेत सादर

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेचा दुसरा उपांत्य सामना आज भारत आणि इंग्लंड दरम्यान मुंबईत वानखेडे मैदानावर रंगणार

**<><><><><>**

नवी दिल्लीत आजपासून ११ वा रायसिना संवाद सुरू होत असून याचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला फिनलँडचे अध्यक्ष डॉक्टर अलेक्झांडर स्टब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून यावेळी त्यांचे प्रमुख भाषण होणार आहे.

रायसीना संवाद ही भू-राजकारण आणि भू-अर्थकारण या विषयांवर आधारीत भारताची प्रमुख आंतरराष्ट्रीय परिषद आहे. या संवादात जागतिक समुदायासमोरच्या महत्त्वाच्या आव्हानांवर चर्चा केली जाते. यंदाच्या संवादामध्ये ११० देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. त्यात विविध देशांचे मंत्री, माजी राष्ट्रप्रमुख, संसद सदस्य, लष्करी अधिकारी तसंच उद्योग क्षेत्रातील अग्रणी व्यक्तींचा समावेश आहे. “संस्कार-दृढता, सामंजस्य-उन्नती” ही यंदाच्या रायसिना संवादाची मध्यवर्ती संकल्पना आहे. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत विविध कार्यक्रम होणार असून त्यात जगभरातील धोरणकर्ते आणि विचारवंत सहभागी होणार आहेत.

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी आज सकाळी नवी दिल्लीत फिनलँडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांची भेट घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अलेक्झांडर स्टब यांची आज हैदराबाद हाऊस इथं भेट झाली. या भेटीमुळे दोन्ही देशांमधील

संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास जयशंकर यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधून व्यक्त केला.

**<><><><><>**

इराण, इस्त्राइल आणि अमेरिकेच्या दरम्यानचा पश्चिम आशियातील संघर्ष आता अधिक तीव्र झाला असून हे तिन्ही देश विविध आखाती देशांमधील एकमेकांच्या महत्त्वाच्या केंद्रावर क्षेपणास्त्र हल्ले करत आहेत. इस्त्रायलच्या वायुदलानं आज पुन्हा इराणवर एकामागोमाग एक हल्ले केले असून यात तेहरानमधल्या अनेक इमारतींना लक्ष्य करण्यात आले आहे. इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यात इराणच्या इसफान आणि काम या संरक्षण प्रणाली तळांनाही लक्ष्य करण्यात आलं असून या हल्ल्यात इराणी वायुदलाची विमानं नष्ट करण्यात आली. इस्त्रायलनं आज लेबनन मधल्या अनेक लष्करी तळांवर हल्ले केले.

**<><><><><>**

अमेरिकेच्या हल्ल्यामुळे समुद्रात बुडालेल्या इराणी युद्धनौकेवरच्या ८४ जणांचे मृतदेह आज श्रीलंकेच्या नौदलानं समुद्रातून बाहेर काढले. हिंदी महासागरात श्रीलंकेच्या समुद्री सीमेच्या पलीकडे अमेरिकेच्या एका पाणबुडीनं काल या नौकेवर हल्ला केला होता. श्रीलंकेचं नौदल या हल्ल्यातल्या इतर दुर्घटनाग्रस्तांचा शोध घेत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. अमेरिकनं हल्ल्यात बुडालेली इरीस डेना ही युद्धनौका नुकतीच भारतात विशाखापट्टणम इथल्या आंतरराष्ट्रीय युद्धसरावानंतर इराणकडे परत जात असताना हा हल्ला करण्यात आला. श्रीलंकेची जहाजं आणि विमान या जहाजाच्या अवशेषांचा आणि त्यातल्या बळींचा शोध घेत आहेत.

**<><><><><>**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रवास रद्द करावा लागलेल्या प्रवाशांना प्रवासाची तारीख बदलण्याचा किंवा तिकीटाचे पूर्ण पैसे परत घेण्याचा पर्याय एअर इंडियानं उपलब्ध करुन दिला आहे. पश्चिम आशियासह युनायटेड किंग्डम आणि युरोपला जाणाऱ्या किंवा तिथून भारतात येणाऱ्या १० मार्चपर्यंतच्या एअर इंडिया कंपनीच्या विमानांसाठी हा पर्याय उपलब्ध असेल. मात्र यासाठी तिकीटाचं आरक्षण २८ फेब्रुवारीपूर्वी निश्चित केलेलं असणं आवश्यक आहे. विमानांच्या उड्डाणांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी प्रवाशांनी

कंपनीच्या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा मदत क्रमांकाशी संपर्क साधावा असा सल्ला प्रवाशांना देण्यात आला आहे.

**<><><><><>**

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नेतृत्व आणि प्रशासन कौशल्याची प्रशंसा केली आहे. ऑस्ट्रेलियात सिडनी इथल्या एका संस्थेच्या कार्यक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची कार्यशैली मूल्याधारीत असून, सामान्य नागरिकांना लाभ मिळवून देण्यावर त्यांचा भर असल्याचं कार्नी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री सातत्यानं मोठ्या जनसभांना संबोधित करतात, यातून नागरिकांचा व्यापक पाठिंबा मिळवण्याचं त्यांचं कसब दिसून येतं असं ते म्हणाले.

भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्याचा मानसही त्यांनी यावेळी व्यक्त केला. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रासोबतच, इतर उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारतासोबत सहकार्याच्या मोठ्या संधी असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशांतर्गत उत्पादनात वाढ झाली असली तरी भारतातल्या मोबाईल डाटाच्या दरात ९७ टक्के घट झाली असल्याची माहिती केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली आहे.  ते आज स्पेनमधल्या बार्सिलोना इथं आयोजित जागतिक मोबाईल परिषदेच्या ‘भाववाढीवर निर्बंध’ या सत्राला संबोधित करत होते. भारताच्या स्पर्धात्मक संरचनेमुळे आणि सार्वजनिक डिजीटल सुविधांमुळे परवडणाऱ्या दरात वाढीला संधी मिळाली असून भारत आता फाईव्ह जीच्या पुढे जाऊन सिक्स जी कडे वाटचाल करत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड- ज्योतिरादित्य शिंदे - - -**

**<><><><><>**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीकरता १० राज्यांमधल्या  ३७ जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आज शेवटचा दिवस आहे. उमेदवारी अर्जांची छाननी उद्या होणार असून ९ मार्च पर्यंत अर्ज मागे घेता येतील. येत्या १६ मार्चला मतदान होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर होतील.

महाराष्ट्रातल्या ७ जागांसाठी विद्यमान खासदार रामदास आठवले यांच्याव्यतिरिक्त ज्येष्ठ नेते विनोद तावडे, माया इवनाते, आणि रामराव वडकुते भाजपातर्फे उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पार्थ पवार यांना उमेदवारी दिली आहे.

विद्यमान खासदार शरद पवार यांनी मविआचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला.

राज्यसभेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसने आज ५ राज्यांमधल्या ६ उमेदवारांची नावं जाहीर केली. तेलंगणातून अभिषेक सिंघवी आणि वेम नरेंदर रेड्डी, छत्तीसगढमधून फूलो देवी नेताम, हरियाणातून कर्मवीर सिंग बौद्ध, हिमाचल प्रदेशात अनुराग शर्मा, आणि तमिळनाडूमधे एम ख्रिस्तोफर तिलक यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राचा २०२५-२६ या वर्षासाठीचा आर्थिक पाहणी अहवाल अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आज विधानसभेत सादर केला.

सलग पाचव्या वर्षी राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती कायम राहील, असा अंदाज,व्यक्त करण्यात आला असून चालू आर्थिक वर्षात सात पूर्णांक नऊ दशांश टक्के वाढ अपेक्षित आहे.

राज्याची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतीशील अर्थव्यवस्था असून कृषी, उद्योग आणि सेवाक्षेत्राची वैविध्यपूर्ण रचना हा तिचा आधार आहे. राजयात गेल्या काही वर्षात रस्ते, मेट्रो, बंदरं, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि लॉजीस्टिक या क्षेत्रातल्या भरीव गुंतवणुकीमुळे पायाभूत सुविधाच्या विकासाला वेग प्राप्त झाल्याचं अहवालात म्हटलं आहे.

व्यवसायसुलभता, डिजिटल प्रशासनाला प्रोत्साहन आणि विशिष्ट क्षेत्र वाढीला चालना यासारख्या सुधारणांमुळे राज्याची स्पर्धात्मक क्षमता वृध्दिंगत झाल्याचं अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

गेल्या चार वर्षांत देशातल्या आघाडीच्या चार राज्यांमध्ये महाराष्ट्राचा आर्थिक विकासाचा वेग सर्वात कमी राहिला असल्याचं सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे. कोविड

नंतरच्या काळात, २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीत महाराष्ट्राचं राज्यांतर्गत सकल उत्पादन सुमारे ४३ टक्क्यांनी वाढलं, मात्र कर्नाटक, गुजरात आणि तामिळनाडूनं महाराष्ट्राला मागे टाकलं असल्याचं या आकडेवारीत म्हटलं आहे. असं असलं तरी २०२४-२५ या वर्षात ४२ लाख ६७ हजार ७७१ कोटी रुपये इतक्या अंदाजित राज्यांतर्गत सकल उत्पादनासह, देशातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून महाराष्ट्राचं स्थान कायम असल्याचंही या आकडेवारीत म्हटलं आहे.

राज्यांतर्गत सकल उत्पादनात कर्नाटकानं सर्वाधिक ६५ टक्क्यांची, त्याखालोखाल गुजरातनं सुमारे ४८ टक्के इतकी, तर तामिळनाडुनं ४७ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे.

<><><><><>

नेपाळमध्ये आज संसदीय निवडणुकीसाठी मतदान होत आहे. नेपाळच्या संसदेतील सदस्यांची एकूण संख्या २७५ असून यातील १६५ सदस्यांची निवड थेट मतदानाद्वारे होते तर ११० सदस्य प्रतिनिधित्वाच्या प्रमाणानुसार निवडले जातात. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या युवा आंदोलनानंतर नेपाळमध्ये ही पहिली निवडणूक होत आहे. नेपाळमध्ये कम्युनिस्ट पक्ष आणि नेपाळी काँग्रेस हे प्रमुख राजकीय पक्ष असले तरी तीन वर्षांपूर्वी स्थापन झालेला राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष आघाडीवर असल्याचं राजकीय विश्लेषकांचं मत आहे.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेचा दुसरा उपांत्य सामना आज भारत आणि इंग्लंड दरम्यान मुंबईत वानखेडे मैदानावर संध्याकाळी सात वाजल्यापासून सुरु होणार आहे. न्यूझीलंडनं काल कोलकाता इथं दक्षिण आफ्रिकेवर ९ गडी राखून विजय मिळवला आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या ८ बाद १६९ धावा झाल्या. न्यूझीलंडनं केवळ एक गडी गमावून तेराव्या षटकातच हे लक्ष्य गाठलं. फिन ॲलेननं नाबाद शंभर धावा फटकावल्या.

//<><><><><>//